**प्रसार माध्यमाकरिता प्रकाशन - जागतिक कासव दिवस २०२१**

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर अनेक ठिकाणी सागरी कासवे घरटी करतात. जगातील ७ प्रजातींपैकी ४ प्रजातींची भारतीय भूखंडावर आणि अंदमान निकोबार व लक्षद्वीप बेटांवर घरटी करण्याच्या नोंदी सापडल्या आहेत. त्यातील केवळ ऑलिव्ह रिडले (*Lepidochelys olivacea*) प्रजातीची कासवे महाराष्ट्राच्या किनाऱ्यांवर घरटी करताना आढळतात. ग्रीन सी (*Chelonia mydas*), हॉक्सबिल (*Eretmochelys imbricata*) आणि लेदरबॅक (*Dermochelys coriacea*) सी टर्टल प्रजातींच्या कासवांच्या काही नोंदी महाराष्ट्राच्या किनाऱ्यांवर नोंदवल्या आहेत परंतु त्या नोंदी किनाऱ्यांवर वाहून आलेल्या कासवांच्या आहेत. अद्याप या प्रजातींच्या महाराष्ट्राच्या किनाऱ्यांवर घरटी करण्याच्या नोंदी सापडलेल्या नाहीत.

ऑलिव्ह रिडले कासवे मोठ्या प्रमाणात महाराष्ट्राच्या किनारी प्रदेशात (रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किनारे) घरटी करतात. या घरट्यांस पूर्वी असणारे मोठे धोके म्हणजे कासवांची शिकार, कुत्रांसारख्या प्राणांची केलेले अंड्यांचे नुकसान, इ. २००२-०३ पासून महाराष्ट्र वन विभाग, स्थानिक स्वयंसेवी संस्था (जसे सह्याद्री निसर्ग मित्र) आणि स्थानिक रहिवासी यांच्या संयुक्त विद्यमाने सागरी कासव संवर्धनाची मोहीम हाती घेतली. या अंतर्गत कासव उबवणी केंद्रांची शृंखला महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर तयार करण्यात आली. २००६ पासून वेळास आणि नंतर आंजर्ले, रत्नागिरी सारख्या गावांमध्ये कासव महोत्सव साजरा करण्यास सुरवात झाली ज्यात पर्यटकांना उबवणी केंद्रातून कासवांची पिल्ले पुन्हा पाण्यात सोडताना पाहण्याचा आनंद मिळायला लागला. (२०२० आणि २०२१ च्या लोकडाऊन काळात कांदळवन प्रतिष्ठानाने ऑनलाईन पद्धतीने या उत्सवांचे आयोजन केले.)

कासव संवर्धन प्रकल्पनांतर्गत महाराष्ट्र वन विभाग आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांमार्फत ऑलिव्ह रिडले कासवांच्या घरट्यांची जागा शोधणे, ती खोदून त्यातुन अंडी अलगद बाहेर काढणे आणि ती अंडी उबवणी केंद्रात नेणे अशी कामे केली जातात. हि उबवणी केंद्रे गार्डन फेन्सिंग जाळीने आच्छादित असतात ज्यामुळे घरट्याचे आणि अंड्यांचे भक्षक, शिकारी आणि पुरापासून संरक्षण होते. या उबवणी केंद्रातील घरट्यांतून बाहेर येणारी पिल्ले बीच मॅनेजर (सागरी स्वयंसेवक) यांद्वारे सुखरूप पुन्हा पाण्यात सोडली जातात.

२०१८ पासून कांदळवन कक्ष आणि कांदळवन प्रतिष्ठानाने महाराष्ट्राच्या किनारी जिल्ह्यांमध्ये जनजागृती कार्यक्रम करायला सुरवात केली. या अंतर्गत किनारी स्वयंसेवकांना उबवणी केंद्राची जागा, कासवांची घरटी शोधणे, त्यातील अंडी सुरक्षित उबवणी केंद्रात आणणे, इ. बाबींचे प्रशिक्षण दिले जाते.

२०१९-२० रोजी पासून कांदळवन प्रतिष्ठानातर्फे रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग मधील किनारी स्वयंसेवकांना मानधन देण्याची सोय करण्यात आली.

खालील तक्त्यात २०१८-१९ ते २०२०-२१ मध्ये झालेल्या घरट्यांची आणि त्यातून बाहेर आलेल्या कासव पिल्लांची माहिती दिली आहे.

| | **Year** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **2018-19** | | | | **2019-20** | | | | **2020-21** | | | |
| **Districts** | **Number of nests** | **Number of eggs** | **Number of hatchlings** | **Hatchling success %** | **Number of nests** | **Number of eggs** | **Number of hatchlings** | **Hatchling success %** | **Number of nests** | **Number of eggs** | **Number of hatchlings** | **Hatchling success %** |
| | | | | | | | | | | | | |
| **Sindhudurg** | 75 | 8107 | 3841 | 47.3 | 65 | 6409 | 4767 | 74.3 | 164 | 17226 | 8769 | 50.9 |
| | | | | | | | | | | | | |
| **Raigad** | 15 | 1727 | 1127 | 65.4 | 15 | 1545 | 808 | 52.2 | 29 | 3211 | 2137 | 66.6 |
| | | | | | | | | | | | | |
| **Ratnagiri** | 143 | 13297 | 7633 | 57.4 | 148 | 19300 | 6574 | 34 | 282 | 30362 | 12800 | 42.15 |
| **Total** | 233 | 23131 | 12601 | 54.5 | 228 | 27254 | 12149 | 44.6 | 475 | 50799 | 23706 | 46.7 |

या तक्त्यावरून असे लक्षात येते की, २०१९-२० पेक्षा २०२०-२१ मध्ये कासव घरट्याच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते. परंतु, २०१४-१५ पासूनच्या माहितीचा अभ्यास करता असे लक्षात येते की, या घरट्यांच्या संख्येत सतत बदल होत असतो त्यामुळे घरट्यांचा संख्येतील वाढ किंवा घाट ही कायम स्वरूपी नाही. तरी, कासव पिल्लांचा विचार करता मागील दोन वर्षांच्या तुलनेत या वर्षी (२०२०-२१) अधिक कासव पिल्ले पुन्हा समुद्रात सुखरूप सोडण्यात आली.

कांदळवन कक्ष, महाराष्ट्र वन विभाग आणि मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संयुक्त पणे भरपाई योजना सुरु केली आहे. या अंतर्गत मासेमारी जाळ्यात अडकलेल्या संरक्षित सागरी प्रजाती जसे कासवे, समुद्री सस्तन प्राणी, इ. ना समुद्रात सुखरूप सोडण्याकरिता कमाल रुपये २५,००० इतकी आर्थिक भरपाई दिली जाते. आजतागायत या योजनेद्वारे ९६ ऑलिव्ह रिडले कासवे, ५२ ग्रीन सागरी कासवे, ३ हॉक्सबिल कासवे आणि एका लेदरबॅक कासवाची सुटका महाराष्ट्रातील मासेमारांमार्फत करण्यात आली आहे. या करीत त्यांना एकूण रुपये २२,५०,८५० इतकी भरपाई कांदळवन प्रतिष्ठानामार्फत देण्यात आली आहे.

कधी कधी समुद्री कासवे त्यांना झालेल्या इजांमुळे किवा संक्रमणांमुळे समुद्राकिनाऱ्यांवर जखमी अवस्थेत आढळतात यांची संख्या पावसाळ्यात जास्त प्रमाणात दिसून येते. जिवंत प्राणी वाहून किनाऱ्यावर आल्यास त्याला त्वरित उपचार मिळणे गरजेचे असते तसेच वाहून आलेला प्राणी मृत असल्यास त्याचे शवविच्छेदन केले जाते ज्यामुळे त्याचा वाहून येण्याचे कारण कळण्यास मदत होते.

सुमारे २०११ पासून वाईल्डलाइफ कंझर्वेशन व ॲनिमल वेल्फेअर असोसिएशन आणि महाराष्ट्र वन विभाग (डहाणू विभाग) समुद्री कासवांसाठी उपचार व संक्रमण केंद्र डहाणू येथे चालवत आहे. या केंद्रामध्ये समुद्रकिनाऱ्यांवर वाहून आलेल्या जखमी कासवांवर उपचार करून व त्यांचे पुनर्वसन करून शक्य असल्यास त्यांना पुन्हा समुद्रात सोडले जाते. या सर्व उपक्रमांकरिता कांदळवन प्रतिष्ठान आर्थिक सहाय्य या केंद्राला वेळोवेळी करत आहे.

कांदळवन कक्षाने मरीन रिस्पॉडंट गटाची स्थापना केली असून त्यात महाराष्ट्र वन विभागातील कर्मचारी (वन परिक्षेत्र अधिकारी), कांदळवन प्रतिष्ठानाचे कर्मचारी, पशुवैद्यकीय डॉक्टर, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा समावेश आहे. हा गट विशेषतः समुद्री कासव आणि इतर सागरी प्राणी समुद्र किनाऱ्यांवर जखमी अवस्थेत वाहून आल्यावर वेगवान प्रतिसादासाठी एक शृंखला म्हणून प्रस्थापित करण्यात आला आहे.

कांदळवन कक्ष, महाराष्ट्र वन विभाग व कांदळवन प्रतिष्ठान यांच्या वतीने मुंबई व जवळपासच्या समुद्रकिनाऱ्यांवर वाहून येणाऱ्या जखमी कासवांच्या उपचाराकरिता ऐरोली येथे कासव उपचार केंद्र उभारण्यात आले. लवकरच अशी उपचार केंद्रे रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात देखील सुरु होतील. कांदळवन काक्षातर्फे कासवांच्या बचाव व पुनर्वसनाकारीता तात्पुरती सुविधा वरील सर्व जिल्यांमध्ये करण्यात आली आहे.

कासव संवर्धन प्रकल्पातील काही छायाचित्रे:



Fig.1: समुद्री कासव उबवणी केंद्र



Fig.2: किनारी स्वयंसेवकांद्वारे करण्यात येणारे जनजागृती कार्यक्रम





Fig.3: कासव मोहोत्स्व

Fig.4: ऑलिव्ह रिडले कासवाचे पिल्लू



**Fig.5:** मासेमारेकरीता भरपाई योजने संदर्भात कार्यशाळा



**Fig.6:** ऑलिव्ह रिडले कासवाची जाळ्यातून सुटका करणारे मच्छिमार



**Fig.7.** जखमी कासवाचे परिक्षण करणारा गट